MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue August 2019


# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

# खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास विषया अंतर्गत राष्ट्रीय चर्चासत्र



# मराठवाडा प्रदेशाचा प्रवाहित होणारा इतिहास

(इ.स.पूर्व ते इ.स.२०१९)

23

संपादक
डॉ.मुकूंद अ.देवर्षी

39) मराठवाड्याच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे योगदान - एक ऐतिहासिक संदर्भ - मा.ना.गोपीनाथ मुंडे
प्रा.डॉ. राधाकृष्ण ल. जोशी, कडा, ता. आष्टी, जि. बीड ||129

40) "विठ्ठलराव नाईक आणि भाटेगांवच्या रोहिल्याची एक यशस्वी ॲक्शन"
प्रा.महेंद्र मोतीराम इंगळे, कळमनुरी - डॉ.बी.एस.क्षिरसागर , हिंगोली ||131

41) मराठवाडा प्रदेशाच्या विकासातील समस्या व उपाय
काळुशे किशोर नारायण, परळी वै. ||133

42) मराठवाड्यातील मंदिर स्थापत्य
डॉ.अशोक कडुभाऊ कानडे, जि.अहमदनगर ||135

43) मराठवाड्यातील कला-स्थापत्याचा विकास
प्रा.धनंजय राधाकिशन जवळेकर, जि. अहमदनगर ||138

44) मराठवाडा प्रदेशातील एक महान संत : सर्वज्ञ दासोपंत
प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी , जि. बीड ||140

45) हैद्राबाद संस्थानाचे भारतातील विलीनीकरणाची भुमिका
प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे, जि.बीड ||142

46) मराठवाड्यातील संत कवयित्रींचे साहित्य आणि जीवन
प्रा.कविता कोंडपल्ले, जि.बीड ||144

47) हैद्राबादच्या निजामाची काही समाजोपयोगी कामे
प्रा.डॉ. सतीश कदम, तुळजापूर ||146

48) मराठवाड्यातील शिल्पकलेचे सामाजिक जीवनातील योगदान : एक अभ्यास
प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे, अंबाजोगाई ||150

49) वेरूळचे ऐतिहासिक महत्व
प्रा.डॉ.रामभाऊ देवराव काशीद, जि.बीड ||153

50) Crucial Role of SardarVallabhbhai Patel in Integration of Nizam State into India
Mr. Mahesh S. Jadhav, Nanded ||155

51) EDUCATIONAL DEVLOPMENT OF MARATHWADA
Dr.Gorakhnath P. Phasale, Dist.Beed ||158

52) यादवकालीन मंदिर स्थापत्य : माणकेश्वर येथील महादेव मंदिर
डॉ. शिवाजी हरी चौगुले, बोंडले ||162



PRINCIPAL
... College, HINGOLI

**40**

# "विठ्ठलराव नाईक आणि भाटेगांवच्या रोहिल्याची एक यशस्वी ॲक्शन"

प्रा.महेंद्र मोतीराम इंगळे
सातव कॉलेज, कळमनुरी

डॉ.बी.एस.क्षिरसागर
शिवाजी कॉलेज, हिंगोली

**********

प्रस्तावना

हैद्राबाद मुक्ती संग्राम हा केवळ भारतात विलीकरण करण्यासाठी आरंभलेला नव्हता तर भारताची राष्ट्रीय एकात्मता व अखंडता टिकून राहण्यासाठी ला लढा विविध भागामध्ये आरंभला होता. भारतात स्वातंत्र मिळून सुध्दा मराठवाड्यातील जनतेला एक वर्ष एक महिना दोन दिवसां नंतर स्वातंत्र मिळाले . ह्या कालावधीत मराठवाड्यातील जनता निजामाच्या जुल्मी, अन्यायी व अत्याचाराच्या वरवंट्याखाली(?) खितपत पडली होती.-१ निजामाच्या जुलमी राजवटीतून स्वातंत्र होण्यासाठी मराठवाड्यातील अनेक सामाजिक संघटना राजकीय संघटना, व शेवटच्या टप्प्यातील सशस्त्र लढ्यामध्ये सीमा कॅम्प वरिल अनेक ज्ञात-अज्ञात असल्याया स्वतंत्र सैनिकाच्या अथक प्रयत्नाने मराठ्वाडा मुक्त झाला. प्रस्तुत लेखामध्ये "शेंबाळपिंप्री सशस्त्र कॅम्प" येथील कॅपटन प्रमुख कॉ.विठ्ठलराव नाईक यांनी भाटेगांवच्या रोहील्याची हेरगिरी करून त्याला ठार करण्याची ॲक्शन कशी केली. हे लिहीण्याचा प्रयत्न केला.

कॉ.विठ्ठलराव नाईक यांचा जन्म दि.०१.०८.१९२० रोजी हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील चिंचोर्डी या गांवी झाला. त्यांच्या वडिलांचे नांव चंपतराव मस्के नाईक व आईचे नांव [illegible]बाई होते. त्यांचे वडील सामान्य परिस्थित गृहस्त होते. शेती उदरनिर्वाह असल्यामुळे आर्थिक स्थिती बिकट होती. तीन भाऊ व एक बहिण अशा चार भांवडा मध्ये विठ्ठलरांवाचा नंबर पाचवा होता.-[illegible] विठ्ठलरांवानी स्वकृतत्वावर प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. वाशिम येथे १० व्या वर्गात शिकत असतांना त्यांचा राजकीय चळवळीशी संबध आला. याच काळात निजमाच्या अन्याय अत्याचाराच्या बातम्या वृत्तपत्रातून येत असे. अशीच एक बातमी वाचनात वृत्तपत्रातून आली की, एका मुलीचा भाऊ त्यांच्या बहिणीला दिवाळीला येत असतांना पूर्णा (जिल्हा परभणी) स्टेशनवर त्याला ठार मारून रजाकारांनी बहिणीला पळवून नेले. या बातमीचा विठ्ठलरावांवर तीव्र परिणाम झाला. पुढे विठ्ठलरावांनी दहावीचे अर्धवट शिक्षण कायमचे सोडले व स्टेट कॉंग्रेसच्या मार्गदर्शनाखाली शेंबाळपिंप्री कॅम्प येथून पूर्णवेळ सहभाग नोंदविला.-२ शेंबाळपिंप्री हे गांव आताचा जिल्हा यवतमाळ ता.पुसद येथे आहे.

रोहिल्याची हेरगिरी- भाटेगांवचा रोहिला नावाचा रोहिला का क्रूर होता.-४ तोच गावांत पार्टीमध्ये गुप्तपणे माहिती देत असे त्यामुळे स्वातंत्र सैनिकांना सशस्त्र लढ्यात अडथळा निर्माण होत होता. शेंबाळपिंपरी कॅम्प प्रमुख दिगांबर पाटलाच्या आदेशावरून विठ्ठलरावावर रोहिला ठार करण्याची जबाबदारी सोपविली. भाटेगांवचा रोहिला पोलीस पाटील रेशमाजीच्या घरी राहत होता. तो स्थानिक पठाण होता. तेव्हा गोळ्याच्या पोलीस पाटलांनी विठ्ठलरावांच्या नावे पत्र दिले. रेशमाजी पाटील तुम्हा मदत करतील. पत्र घेवून विठ्ठलराव भाटेगांवाच्या पोलीस पाटलांच्या घरी गेले. पोलीस पाटलांनी विठ्ठलरायांना घरी झोपविले. तिन तासानंतर हा रोहिला घरी आला त्यांच्या सोबत एक व्यक्ती होता तेव्हा विठ्ठलरावांनी मनात बेत केला भाटेगांव येथे महादजी पाटलाच्या घरी जाणेचे ठरविले . मी महार आहे, गोळला जात आहे, आमच्या गावची पाटलाची मुलगी भाटेगांवला आहे त्या गावच्या पोरीस भेटण्यास म्हणून आलो आहे. तसा बहाना करुन जाणेचे विठ्ठलरांवानी ठरविले. विठ्ठलराव जाळ्यात सापडत होते ह्याची जाणीव त्यांना झाली. कारण ज्यांनी मदत करण्याची ठरविले तो विश्वास घातकी निघाला. विठ्ठलराव त्यास विचारून रोहिल्याची माहिती घेत तेव्हा सखाराम हासला. त्याचवेळी विठ्ठलरांवाच्या मनात शंका निर्माण झाली. सखाराम हा विश्वासघातकी निघाला. सखाराप पुढेपुढे निघत होता. विठ्ठलराव मागेमागे चालत होते.

दुपारी बारा वाजणेचीवेळ होती. विठ्ठलराव लघवीचा बहाणा करून मागे थांबले, शेतात त्यावेळी कापसाचे पिक होते. सखराम थेट महादजी पोलीस पाटलाच्या घरी निघाला, त्याच्या घराचे तोंड पूर्व दिशेला होते. वाडा चिरेबंदी होता वाड्याच्या पाठीमागून एक दरवाजा होता त्याच्या वाड्यावर एक माडी होती. महादजी पाटलाच्या घरी पोलीस होते माडीवरून कोणीतरी एक व्यक्ती टंचावरुन विठ्ठलरांवाकडे बोट दाखवून खुणावत होते हे विठ्ठलरावांना दिसले तेव्हाच विठ्ठलरावांच्या पोटात शंकेचा गोळा उठला बाजूला विहिर होती .



PRINCIPAL
[illegible] College, HINGOLI

निष्कर्षः

१. कौ.विठ्ठलरावांची त्याग व बलीदान वृत्ती स्पष्ट होते.
२. भाटेगांव परिसरातील लोकांमधील मौला रोहिल्याची भिती नष्ट केली.
३. अन्यायी अत्याचारी "भाटेगांवचा मौला नावाचा रोहिला" ठार केला.
४. विठ्ठलराव मधील राष्ट्रीय एकात्मतेची भावना स्पष्ट होते.

संदर्भ सुची :

१. भालेराव अनंत - हैद्राबाद स्वातंत्र संग्राम आणि मराठवाडा मौजे प्रकाशन गृह मुंबई-२००१, पृष्ठ १६
२. प्रत्यक्ष मुलाखत - चंपतराव विठ्ठनराव मस्के (नाईक ) दि.०९.०८.२०१९ ठिकाण: कळमनुरी येथील राहते घर (त्यांचा मुलगा)
३. आसाराम लोमटे (संपादक) - "धगधगता निखारा " विशेष गौरव अंक- १६.१०.२००१ पृष्ठ -७५
४. आण्णाराव टाकळगव्हाणकर- हैद्राबाद मुक्ती संग्राम सांगाती प्रकाश, नांदेड दि.०१.०५.१९८९ पृष्ट ३१
५. आसाराम लोमटे (संपादक)- "धगधगता निखारा " विशेष गौरव अंक- १६.१०.२००१ पृष्ठ -७५
६. (कित्ता) - पृष्ठ-१५
७. आण्णाराव टाकळगव्हाणकर- हैद्राबाद मुक्ती संग्राम सांगाती प्रकाश, नांदेड दि.०१.०५.१९८९ पृष्ट २६

41

# मराठवाडा प्रदेशाच्या विकासातील समस्या व उपाय

काळुशे किशोर नारायण
संशोधक विद्यार्थी,
पदव्युत्तर इतिहास विभाग
वैद्यनाथ कॉलेज, परळी वै.

**********

प्रस्तावना:

महाराष्ट्राच्या प्रमुख विभागात मराठवाडा सर्वविकास क्षेत्रात अधिक मागासलेला कृषिप्रधान अवर्षण प्रणव आणि अति पाणी तुटीचा प्रदेश आहे. मराठवाड्यचे मागासपण द्रुतगतीने वाढत असून अशीच परिस्थिती चालू राहिली तर मराठवाडा प्रत्येक बाबतीत राज्याच्या प्रगत भागावर अवलंबून राहणारा दुय्यम दर्जाच्या नागरिकांचा, मजुरांचा, वसाहतीचा व आत्महत्या करीत राहणाऱ्या कायमस्वरूपी प्रदेश बनून राहील. आज मराठवाडासमोर विकासाचे अनेक प्रश्न आहेत.

दरवर्षी पाण्याचा प्रश्न उभा राहतो आणि पुन्हा पुन्हा अयशस्वी ठरलेल्या योजना राबवण्याचा सल्ला दिला जातो. महाराष्ट्रात जवळपास ४० टक्के भाग दुष्काळप्रणव आहे. मराठवाड्यतील हे संकट केवळ अस्मानी नसून यात काही राजकीय हस्तक्षेप देखील आहेत. सध्या मराठवाड्यतील २०८ गावांसाठी योजना तयार केली असून वर्षाला १००० गावे टंचाईमुक्त करण्याची योजना आहे

उद्दिष्टे:

१. मराठवाडा प्रदेश विकासात बाधा आणणाऱ्या चल समस्यांचा सविस्तर अभ्यास करणे.



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI